पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी,पुणे-४४
जा.क्र.अक्षेका/११/कावि/३५९अ/२०१५
दिनांक – ५/१२/२०१५

प्रति,

मा. श्री./श्रीमती.------------------------------
सदस्य/सदस्या, अ प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी – ४४.

विषय – अ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक
९/१२/२०१५ रोजी आयोजित केलेबाबत..

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभा समितीची माहे डिसेंबर मासिक सभा बुधवार दिनांक ९/१२/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृह येथे आयोजित केली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. आपण सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

आपली विश्वासू,

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

अ प्रभाग समिती

कार्यपत्रिका क्रमांक ९

दिनांक:- ९/१२/२०१५ वेळ: दुपारी १२.०० वाजता

.......................................................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे डिसेंबर २०१५ ची मासिक सभा बुधवार दिनांक ९/१२/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृह येथे आयोजित केली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दिनांक ४/११/२०१५ रोजी घेणेत आलेल्या माहे नोहेंबर २०१५ चे मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक ८) कायम करणे.

| | |
|---|---|
| विषय क्रमांक १ | मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.<br>प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ. सो.६.०० मीटर रुंद रस्त्यास " हस्तीमल शेठ गादिया मार्ग " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे<br>(दिनांक ०९/ १२/२०१५ रोजीच्या सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे) |
| विषय क्रमांक २ | मा.संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. १५/७/२०१५ रोजीचा प्रस्ताव.<br>प्रभाग क्रमांक १९ मधील बस टर्मिनल (मुकाई चौक) येथे आहे. त्या बस टर्मिनलचे " मुकाई बस टर्मिनल " असे नामकरण करणेत यावे.<br>( दिनांक ०९ /१२/२०१५ रोजीचे सभेमध्ये घेण्याचे निर्णयाप्रमाणे.) |
| विषय क्रमांक ३ | मा.निलेश शंकरराव पांढरकर यांचा दि. २/११/२०१५ रोजीचा प्रस्ताव.<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे आकुर्डी मंजूर विकास योजना आराखडयात स.नं. १७९ पैकी मध्ये आरक्षण क्रमांक २७३ हे प्राथमिक शाळा हे आरक्षण असून सदर आरक्षणातील क्षेत्रामध्ये सुमारे ४०० कुटुंबे राहतात. या आरक्षणामधील जागेत आरक्षण मंजूर होण्या आगोदर पासून घरे आहेत. तसेच या आरक्षणाच्या आजूबाजूला म्हणजेच अर्धा ते एक किलोमीटर अंतरावर १३ ते १४ शाळा आहेत व महानगरपालिकेची श्री. वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय हे या प्रभागात आहे. त्यामुळे मंजूर विकास योजनेतील स.नं. १७९ पैकी मधील आरक्षण क्र. २७३ ची आवश्यकता नाही. म्हणून मंजूर विकास योजनेतील स.नं. १७९ पैकी मधील आरक्षण क्रमांक २७३ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करुन सदर आरक्षणातील क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेकामी मा. शहर सुधारणा समिती मार्फत मा. महानगरपालिका सभेकडे शिफारस करणेस मान्यता देणे.<br>( दि. ९/१२/२०१५ रोजीचे सभेमध्ये घेण्याचे निर्णयाप्रमाणे.) |
| विषय क्रमांक ४ | मा. आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरापालिका यांचेकडील प्रस्ताव क्र. स्थापत्य / बीआरटीएस /३५५/२०१५, दि. ७/११/२०१५<br>रेल्वे उड्डाणपुल ते भक्ती शक्ती चौकापर्यंत ४५ मीटर रस्ता विकसीत करणे ( नि. नो.क्र. १०/१- २०१४/१५० या कामाच्या रस्ता रुंदीमधील चैनेज ५१०० येथील लोक शाहीर |

| | |
|---|---|
| | आण्णाभाऊ साठे पुतळा स्थलांतरीत करणे तसेच महानगरपालिकेचे कारंजे पाडण्यास मा. अ प्रभाग समितीची मंजुरी घेणे  बाबत...<br>निगडी येथील भक्ती शक्ती चौक ते द्रुतगती मार्गाजवळील किवळे मुकाई चौकापर्यंत ४५ मीटर बीआरटीएस रस्ता विकसीत करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. याकामाअंतर्गत किवळे येथील मुकाई चौक ते रेल्वे उड्डाण पुल पर्यत ४५ मीटर रस्ता, रेल्वे लाईनवर उड्डाण पुल ( ROB)  बांधणे व रेल्वे उड्डाणपुल ते भक्ती शक्ती चौक निगडी पर्यंतचा ४५ मीटर  रुंदीचा रस्ता विकसीत करणे अशा एकुण तीन टप्प्यांचा समावेश आहे.<br>रेल्वे उड्डाणपुल ते भक्ती शक्ती चौक निगडी पर्यंतचा ४५ मीटर रस्ता रुंदीने भक्ती शक्ती निगडी चौक  चैनेज ५१०० येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुतळा व उद्यान तसेच चैनेज ५२०० येथे महानगरपालिकेचे कारंजे बाधित होत आहे.  अवलोकनार्थ रस्त्याचा नकाशा सोबत जोडला आहे. रस्ता रुंदीतील लोक शाहीर आण्णाभाऊ साठे पुतळा निगडी येथील बसटर्मिनस लगत स्थलांतरीत करण्यासाठी कार्यकारी  अभियंता स्थापत्य फ क्षेत्रीय कार्यालय या मार्फत कार्यवाही करणेत येत आहे. कारंजे व उद्यान  पाडणेस मंजुरी मिळणेकामी मा. अ प्रभाग समितीपुढे विषयपत्र  ठेवणेस प्रस्ताव सादर करणेत येत आहे. रस्ता रुंदीतील लोकशाहीर  आण्णाभाऊ साठे यांचा पुतळा महापालिकेच्या धोरणाप्रमाणे स्थापत्य  फ क्षेत्रीय  कार्यालयामार्फत नेहरुनगर येथील मध्यवर्ती भांडारामध्ये सुरक्षित ठेवण्यात येईल.<br>सदर प्रस्तावास मा. आयुक्त सो. पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी  दि. ५/११/२०१५ चे कार्यालयीन टिपणीनुसार मंजुरी दिली आहे.  रस्ता रुंदीने बाधित लोक शाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुतळा  स्थलांतरीत करणे बाबत आवश्यक ती कार्यवाही करणे बाबत कार्यकारी अभियंता फ क्षेत्रीय  कार्यालय यांना स्थापत्य बीआरटीएस विभागामार्फत कळविण्यात येईल. कांरजे ( Fountain) पाडणेस मा. अ प्रभाग समितीच्या मंजुरीसाठी विषय पत्र सादर करणेत येत आहे. तरी  रेल्वे उड्डाणपुल ते भक्ती शक्ती चौकापर्यंतच्या  ४५ मीटर रस्ता रुंदीमधील चैनेज ५२०० निगडी येथील महानगरपालिकेचे कारंजे ( Fountain) पाडणेबाबत अ प्रभाग समितीच्या बैठकीमध्ये  मंजुरी घेणे. |
| विषय क्रमांक  ५ | मा. सभापती यांचे परवानगीने सभा कामकाजात घेणेत येणारे ऐनवेळचे विषय. |

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रिय कार्यालय निगडी, पुणे ४४
जा.क्र.अक्षेका/११/कावि/  ३५९अ  /२०१५, दिनांक :  ०५  / १२  /२०१५